LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

ARTHA (Commercial Weekly)
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख ७ जानेवारी, १९५९ | अंक १

## विविध माहिती

**भिलई कारखान्यांतील पहिली भट्टी**—मध्यप्रदेशांत भिलई येथें रशियाच्या मदतीनें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांतील पहिली भट्टी लवकरच चालू करण्यांत येणार आहे. भट्टीचें उद्घाटन राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद करणार आहेत. १८ महिन्यांपूर्वी कारखान्याच्या कामाला प्रारंभ झाला. तेव्हांपासून उभारणीच्या कामीं झपाट्यानें प्रगति करण्यांत आली आहे.

**जाहिरातींचे भरमसाट दर**—नागपूर येथें भरणाऱ्या काँग्रेसच्या निमित्तानें जो स्मारकग्रंथ काढण्यांत येणार आहे त्यांत यावयाच्या जाहिरातींचे दर असे आहेतः— खास जाहिरात १५,००० रुपये, पूर्ण पान १०,००० रुपये, अर्धे पान, ५,००० रुपये व पाव पान २,५०० रुपये. जाहिरातींवर करण्यांत येणाऱ्या खर्चावर प्राप्तीकर घेण्यांत येत नाहीं. सर्व बड्या उद्योगपतींना जाहिरात देण्याबद्दल कोरा फॉर्म पाठविण्यांत आला आहे.

**चहाची वाढती निर्यात**—रशियाचें पांच जणांचें एक चहाविषयक प्रतिनिधिमंडळ सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहे. मंडळाच्या नेत्यानें कोचीनमधील निर्यात व्यापाऱ्यांना असें सांगितले कीं, रशियाला हिंदी चहाची अधिक निर्यात करता येणें शक्य आहे. पण त्याचा दर्जा, स्वाद व चव ह्या दृष्टीनें, चांगला असणें आवश्यक आहे.

**वृत्तपत्रें वाटणाऱ्यांचा संप संपला**—न्यूयॉर्कमधील वृत्तपत्रांचें वांटप करणाऱ्या कामगारांच्या संघटनेनें १९ दिवस वेतनवाढीसाठी संप पुकारला होता. तडजोड होऊन संप संपला. संपाच्या अवधींत न्यूयॉर्कमधील नऊ प्रमुख वृत्तपत्रें बंद पडलीं होतीं. न्यूयॉर्कच्या वृत्तपत्रसृष्टींत एवढा मोठा संप कधींच झाला नव्हता.

**चीनमधील लोखंडाचा साठा**—चीनच्या सरकारनें देशांतील लोखंडाचे साठे शोधून काढण्याची मोठी मोहीम चालू केली आहे. संशोधनाचें काम करणाऱ्या भूगर्भशास्त्रज्ञांनीं लोखंडाच्या खनिजाचे ६०० साठे आतांपर्यंत शोधून काढले आहेत. लोखंडाच्या खनिजाच्या बाबतींत चीन आतां जगांत दुसऱ्या क्रमांकाचा देश झाला आहे. पहिला क्रमांक रशियाचा आहे.

**पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकेचे नियम**—भारत सरकारनें पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांच्या नियमांत दुरुस्ती केली आहे. नवीन नियमांप्रमाणे दर आठवड्याला १,००० रुपयांपेक्षा अधिक रक्कम खातेदारांना काढता येईल. नोटीस न देतां १,००० रुपयांपेक्षा अधिक रक्कम अशा रीतीनें काढण्यांत आल्यास खातेदाराच्या खातीं १ रुपया नांवें टाकण्यांत येईल.

**मुंबईमधील घरांची टंचाई**—मुंबईत सुमारें ७०,००० इमारती असून त्यांपैकीं ८,००० घरांची मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करणें आवश्यक झालें आहे. दुरुस्त्या करण्यासाठी प्रत्येक घरामागें २५,००० रुपये खर्च येईल. नाहींतर त्या कोसळण्याचा धोका आहे. आणखी १२,००० घरांना किरकोळ दुरुस्त्यांची गरज आहे. मुंबईच्या ३८ लाख लोकवस्तीपैकीं ८ लाख लोक पदपथावर राहतात.

**उदयपूर येथें कापडाची गिरणी**—कानपूर येथील एका गिरणीनें उदयपूर येथें कापडाची गिरणी काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं गिरणी काढण्यास मदत म्हणून राजस्थानच्या सरकारनें ३०,००० रुपयांची रक्कम कर्जाऊ देण्याचें कबूल केलें आहे. राजस्थान औद्योगिक दृष्ट्या मागासलेला आहे.

**पंतप्रधान नेहरूंची देणगी**—पंतप्रधान जवाहरलाल नेहरू ह्यांनीं अड्यार येथील कॅन्सर इन्स्टिटयूटला १५,००० रुपयांची देणगी दिली आहे. मुलांच्या कॅन्सरविषयीं संशोधन करण्यासाठी देणगीचा उपयोग करण्यांत येणार आहे. अड्यारच्या ह्या संस्थेची स्थापना वुइमेन्स इंडिअन असोसिएशननें केलेली आहे. संशोधनासाठी खास वेगळी शाखा काढण्यांत येणार आहे.

**सहकारी संस्था व राजकारण**—मुंबई राज्य सहकारी साखर कारखान्यांच्या फेडरेशनची तिसरी सर्वसाधारण सभा पुणें येथें भरली होती. फेडरेशनचे अध्यक्ष श्री. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं ह्या प्रसंगीं बोलतांना देशांतील राजकीय पक्षांना अशी विनंती केली कीं, त्यांनीं सहकारी संस्थांत काम करतांना आपलें राजकारण दूर ठेवावें.

**रेडिओचा परवाना घेण्याची मुदत**—रेडिओच्या ज्या मालकांनीं परवाना न घेतां अगर पहिल्या परवान्याची मुदत संपून गेल्यावर दुसरा परवाना न घेतां रेडिओ चालू ठेवला असेल त्यांना मार्च १९५९ अखेर कांहींहि जादा आकार न देतां नवा परवाना घेतां येईल, असें पोस्ट खात्यानें जाहीर केलें आहे. दरसाल १०,००० बिगर-परवाना रेडिओ खात्यातर्फे उघडकीस आणले जातात.

**शार्क माशाचें तेल**—त्रिवेंद्रम येथील सरकारी मालकीच्या शार्क लिव्हर ऑइलच्या कारखान्याचा विस्तार करण्याची योजना आखण्यांत आली आहे. नव्या योजनेप्रमाणें कारखान्यांत तयार करण्यांत येणाऱ्या तेलाचें उत्पादन पांच पट वाढेल, व तेलाचें प्रमाणीकरण करण्यांत येईल. कारखान्याची पुनर्घटना झाल्यावर दरसाल ७,५०० गॅलन तेलाचें उत्पादन होईल.

### निर्यातीसाठी एक लाख टन साखर
### किंमत नियंत्रण चालू रहाणार

भारत सरकारनें देशांतील साखरेचें उत्पादन, गरज व पुरवठ्याच्या परिस्थितीचा संपूर्णपणें विचार करून ३१ ऑक्टोबर १९५९ ला संपणाऱ्या कालवधींत १ लाख टन साखर निर्यातीसाठी खुली करण्याचें ठरविलें आहे.

त्याचप्रमाणें पंजाब, उत्तर प्रदेश व उत्तर बिहार राज्यांत १९५८—५९ च्या हंगामांत निर्वात काहिली असलेल्या कारखान्यांत तयार झालेल्या साखरेच्या किंमतीवरील नियंत्रणहि चालू ठेवण्याचें ठरविण्यांत आलें आहे. उत्तर प्रदेश व उत्तर बिहार येथील कारखान्यांचे बाबतींत ही किंमत कारखान्यांचे ठिकाणच्या रेल्वेस्टेशनांपर्यंतच्या वाहतुकीसुद्धां ३६ रु. मण तर पंजाबांत आय. एस्. एस्. डी-२९ जातीच्या साखरेचे बाबतींत ३६·५० रुपये मण अशी आहे. या तीन राज्यांतील साखरकारखान्यांस नियंत्रित दरापेक्षा अधिक दरानें आपल्याकडील खुले झालेल्या साखरेच्या साठ्याची विक्री करतां येणार नाहीं.

तसेंच सरकारनें पूर्वीप्रमाणेंच कारखान्यांतील साखरेच्या ठराविक किंमतीनुसार साखर ताब्यांत घेऊन ती वांटण्याचें ठरविलें आहे. तदनुसार पुढील ठिकाणीं साखरेच्या किंमती या स्टेशनांपर्यंतच्या रेल्वेवाहतुकीसुद्धां पूर्वीप्रमाणेंच पुढीलप्रमाणें असतील:—

दिल्ली—३६·५० रुपये मण
कानपूर—३६·७५ रुपये मण
कलकत्ता—३८·०० रुपये मण
मुंबई—३९·०० रुपये मण

सरकारनें ठरवून दिलेल्या अटींनुसार अर्जदारांस साखरेचें वाटप करण्यांत येईल. यासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने नवी दिल्ली येथील डायरेक्टोरेट ऑफ शुगर अँड वनस्पति अगर कानपूर, कलकत्ता व मुंबई येथील शुगर इन्स्पेक्टरांच्या कचेऱ्यांत मिळूं शकतील.

---

### नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटाबाबतचे नवे नियम
### १ जानेवारी, १९५९ पासून अंमलबजावणी

नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांबाबत टपालकचेरीनें बदललेल्या नियमांची अंमलबजावणी १ जानेवारी, १९५९ पासून चालू होईल. १९४४ पासून लागू असलेले नियम या दिवशीं रद्द होतील. नवीन नियमांतून या सर्टिफिकिटांच्या कामकाजासंबंधींचा तपशील काढून टाकण्यांत आला असून, तो आतां या खात्याच्या मॅन्युअलमध्यें समाविष्ट करण्यांत येईल.

या नवीन नियमांनुसार शेड्यूल्ड व को—ऑपरेटिव्ह बँका, इन्कार्पोरेटेड कंपन्या व रजिस्टर्ड फर्म्स आणि असोसिएशन्स यांनीं सदर सर्टिफिकिटांत रकम गुंतविण्याची मर्यादा १५,००० रुपयांवरून २५,००० रुपयांपर्यंत आणि प्राप्तीकराची सूट असलेल्या देणग्या मिळणाऱ्या धर्मार्थ संस्थांचे बाबतींत ६०,००० रुपयांवरून १,००,००० रुपयांपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

---

### महाराष्ट्र बँकेचे शेअर्स स्टॉक एक्सचेंजवर आले

मुंबईच्या शेअर बाजाराच्या कॅश लिस्टांत ८ नोव्हेंबर, १९५८ पासून बँक ऑफ महाराष्ट्रचें नांव दाखल करण्यांत आलें आहे. ४० रुपये भरणा झालेल्या कांहीं शेअर्सची विक्री तुरळकच झाली, ती ४० रुपये दरानें झाली. त्यानंतर रु. ४२—५० पर्यंतचें कोटेशन होतें.

### उद्यम शुश्रूषा विशेषांक*

शुश्रूषेबद्दलच्या शास्त्रीय ज्ञानाच्या अभावामुळें, सदिच्छा असूनहि आजाऱ्याची आवश्यक तशी शुश्रूषा होऊं शकत नाहीं. औषधी उपचार व शस्त्रक्रिया ह्यांना योग्य शुश्रूषेची जोड जरूर असते. शुश्रूषेचीं उपकरणें कशी वापरावयाचीं, ह्याची माहितीहि कित्येकांना नसते. इस्पितळांतील परिचारिकांना खास शिक्षण दिलेलें असतें; पण घराघरांतील स्त्री—पुरुषांना त्याविषयीं सामान्य ज्ञानहि नसतें. चांगल्या शुश्रूषेमुळें आजाराची तीव्रता भासत नाहीं, लवकर बरें वाटतें आणि आजाऱ्याला सुख लाभतें. केवळ आस्था पुरी पडत नाहीं; ती प्रभावी करण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते. हें मार्गदर्शन करणारा शुश्रूषा विशेषांक "उद्यम" नें प्रसिद्ध करून सामान्य लोकांची फारच मोठी सोय केली आहे. ह्या विशेषांकांत प्रथम कांहीं डॉक्टर व परिचारिका ह्यांच्या अनुभवसिद्ध सूचना असलेल्या मुलाखती देण्यांत आल्या असून, शुश्रूषेची मानसिक बाजू "करपलेल्या लतेचें संजीवन" ह्या लेखांत श्री. वा. काळे ह्यांनीं दिग्दर्शित केली आहे. "नित्याच्या आजारांत शास्त्रीय पद्धतीनें करावयाची शुश्रूषा" (लेखक: डॉ. य. त्र्यं. गद्रे) ह्या मुख्य शीर्षकाखाली अत्यंत उपयुक्त माहितीचें संकलन करण्यांत आलें आहे. हाडाच्या रोग्यांची शुश्रूषा (लेखक: डॉ. व. न. वांकर), प्रथमोपचार, फ्लॉरेन्स नाइटिंगेलचें चरित्र, इत्यादि लेखहि उपयुक्त व मार्गदर्शक आहेत. घरांतील आबालवृद्धांनीं ह्या विशेषांकाचा जरूर फायदा करून घ्यावा.

*जानेवारी, १९५९ चा अंक. किंमत रु. १=५०.

---

### चित्रमयजगत् पाकिस्तान विशेषांक*

चित्रमयजगत्नें आपला ५० व्या वर्षाचा पहिला अंक पाकिस्तान विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे. जागतिक घडामोडींचा सचित्र परिचय करून देण्याचें कार्य ह्या मासिकानें सतत चालविलें आहे, त्याला अनुसरूनच ह्या विशेषांकांत पाकिस्तानविषयक बहुविध माहिती देण्यांत आली आहे. पाकिस्तानाची भूरचना आणि लोकस्थिति ह्या लेखास सहाजीकच प्रथम स्थान असून त्यानंतर पाकिस्तान आणि अमेरिका (ना. र. देशपांडे) पाकिस्तानपुढील प्रश्न, शेती आणि उद्योगधंदे (श्री. रा. टिकेकर), पंचवार्षिक नियोजन (त्र्यं. र. देवगिरीकर), पाकिस्तानी राजकारण (रा. प्र. कानिटकर) व पाकिस्तानांतील पक्ष हे लेख देण्यांत आले आहेत. भारत व पाकिस्तान ह्यांचेमधील तेढीचे संबंध, पाकिस्तानमधील अस्थिरता, पाकिस्तानला अमेरिकेचें लष्करी साहाय्य, इत्यादींमुळें पाकिस्तानविषयीं आपणांस खरीखुरी माहिती असणें अत्यावश्यक आहे. प्रस्तुत विशेषांकानें ती गरज भागविली आहे.

*जानेवारी, १९५९ किं. १ रु.

---

★ होतकरू संसारी तरुण—तरुणींसाठी ★
श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज

कण आणि क्षण रु. २=५०
पुढे पाऊल रु. २=००
तुमचें स्थान कोणतें? रु. २=००

ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन
तुमचें शुभचिंतन प्रभावी करा!
—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—

# अर्थ

बुधवार, ता. ७ जानेवारी, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## बिर्ला गटांतील कंपन्यांची एकमेकांत भांडवल गुंतवणूक

बिर्ला गटांत मोडणाऱ्या कंपन्यांची संख्या १८२ आहे. त्यांचें अधिकृत भांडवल १७५ कोटी रुपये आहे व वसूल झालेलें भांडवल ५८·३५ कोटी रुपये आहे. ह्यांपैकी ३१ कंपन्या खाजगी आहेत, व त्यांचें अधिकृत भांडवल ३·४५ कोटी रुपये व वसूल भांडवल १·६८ कोटी रुपये आहे. 'संकीर्ण' व 'व्यापारी' ह्या सदरांत ह्यांपैकी सर्वांत अधिक म्हणजे एकूण संख्येच्या एकतृतिआंश कंपन्या आहेत. सर्वांत अधिक वसूल भांडवल कापड, लोकर, कृत्रिम रेशीम व ताग ह्यांच्या गिरण्यांत आहे. एकूण भांडवलाच्या ३८ टक्के भांडवल ह्या धंद्यांतून आहे. त्यानंतर एंजिनिअरिंगच्या धंद्यांत २० टक्के भांडवल आहे. सात मॅनेजिंग एजन्सीज १·३० कोटी रुपयांच्या वसूल भांडवलाच्या आधारानें ३४ कंपन्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण चालवितात. ह्या कंपन्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह फंड ६३·२० कोटी रुपयांचा आहे. त्याशिवाय २३ कंपन्याहि अप्रत्यक्षपणें त्यांच्या अखत्यारींत आहेत व त्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह फंड ३·१९ कोटी रुपये आहे. कंपन्यांची धंद्यांच्या स्वरूपावरून छाननी केली तर असें दिसून येते कीं, ज्या धंद्यांना औद्योगिक म्हणतां येणार नाहीं अशा व्यापारी, प्रकाशनाच्या, अगर भांडवल गुंतवणाऱ्या कंपन्याहि बऱ्याच आहेत. १९४६ सालीं अगर त्यानंतर रजिस्टर झालेल्या कंपन्यांची संख्या ९३ आहे. १९४६ सालापूर्वी रजिस्टर झालेल्या कंपन्यांची संख्या ८९ आहे. तथापि १९४६ सालीं व नंतर रजिस्टर झालेल्या कंपन्यांचे अधिकृत व वसूल भांडवल १९४६ पूर्वी रजिस्टर झालेल्या कंपन्यांपेक्षा अधिक आहे. त्याचप्रमाणें वसूल झालेल्या भांडवलाचें अधिकृत भांडवलाशीं असलेलें प्रमाणहि अधिक आहे.

१९४६ सालापासून नव्या खाजगी कंपन्यांची नोंदणी लक्षांत भरण्याइतकी कमी झालेली दिसते. एक विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्या कामासाठी जुन्या कंपन्या काढण्यांत आल्या होत्या त्यांनाच चालना देण्याऐवजीं त्याच कामासाठी नव्या कंपन्या काढण्यांत आलेल्या दिसतात. ज्या कंपन्यांचे ताजे ताळेबंद मिळूं शकले त्यांपैकी ४५ कंपन्यांची भांडवल गुंतवणुकीचीं खातींच दिसून येतात. ह्या कंपन्यांनीं भारतांत गुंतविलेल्या भांडवलाची रक्कम ३४·७७ कोटी रुपये आहे. भांडवलाची गुंतवणूक सरकारी रोख्यांतहि झालेली आहे. कारण, बँकांकडून घेतलेल्या कर्जांना उत्तम तारण द्यावें लागतें. शिवाय रेल्वे, कस्टम खातें व अबकारी खातें ह्यांच्या देण्याकडेहि त्यांचा उपयोग होतो. बँका आणि विमा कंपन्या ह्यांच्या परदेशांतून शाखा असल्यामुळें त्यांनीं परदेशी कंपन्यांतून रकमा गुंतविणें साहजिक असलें तरी बिर्ला गटांतील कांहीं कापडाच्या व तागाच्या गिरण्यांनीं परदेशी कंपन्यांतून गुंतवणूक कां करावी हें सहज समजण्यासारखें नाहीं.

भारतामधील कंपन्यांच्या शेअर्समध्यें व डिबेंचर्समध्यें गुंतविलेली एकूण रक्कम १३·१ कोटी रुपये आहे. ह्यांपैकी ८·६७ कोटी रुपयांच्या रकमेचा तपशील मिळूं शकतो. ह्या रकमेपैकी १·८० कोटींची गुंतवणूक १९४६ पूर्वीच्या कंपन्यांमधून झालेली आहे आणि ६·८७ कोटींची गुंतवणूक त्यानंतरच्या कंपन्यांमधून झालेली आहे. १९४६ च्या पूर्वी रजिस्टर झालेल्या कंपन्यांनीं ४·८६ कोटींची गुंतवणूक केलेली आहे; तर नंतरच्या कंपन्यांनीं ३·८१ कोटींची गुंतवणूक केलेली आहे. १९४६ च्या पूर्वीच्या कंपन्यांनीं केलेल्या गुंतवणुकींपैकी फक्त १७ टक्के गुंतवणूक त्याच काळांत रजिस्टर झालेल्या कंपन्यांत झालेली आहे आणि ८३ टक्के गुंतवणूक १९४६ सालीं व त्यानंतर झालेल्या कंपन्यांकडून झालेली आहे. बिर्ला गटांतील कंपन्यांनीं केलेल्या भांडवल–गुंतवणुकींपैकी बहुतेक गुंतवणूक त्याच गटांतील कंपन्यांमधून झालेली आहे. एकूण ८६७·३० लाखांच्या गुंतवणुकींपैकी २९५·८२ लाखांची गुंतवणूक त्याच गटाच्या स्टॅट्यूटरी उपकंपन्यांतून झालेली आहे व ४५३·१० लाखांची गुंतवणूक त्याच गटांतील इतर कंपन्यांतून झालेली आहे. म्हणजे ७४८·९२ लाखांची अथवा एकूण गुंतवणुकीच्या ८६ टक्के गुंतवणूक गटांतील कंपन्यांतच करण्यांत आली आहे. सुमारें ६७·१९ लाखांची अगर ८ टक्के गुंतवणूक गटाबाहेरच्या ९९ कंपन्यांतून झालेली आहे.

गटांतील ३२ सार्वजनिक कंपन्यांनीं भारतामधील खाजगी रोख्यांतून १२·२३ कोटींची गुंतवणूक केलेली आहे. ह्या गुंतवणुकीपासून ४४·५७ लाख रुपयांचें उत्पन्न मिळतें. उत्पन्नाची सरासरी ३·६ टक्के पडते. गटांतर्गत कंपन्यांतून केलेल्या गुंतवणुकींपैकी ४६ टक्के गुंतवणूक कापडाच्या गिरण्यांची आहे व त्यांना सर्वांत कमी म्हणजे सरासरी १ टक्का नफा मिळतो. साखर कंपन्यांनीं ज्या गुंतवणुका इतर कंपन्यांतून केल्या आहेत त्यावर त्यांना फारसा अगर मुळींच नफा सुटत नाहीं. परंतु त्यांच्या उपकंपन्या प्रत्यक्षत: भांडवल गुंतवणुकीचेच व्यवहार करतात आणि चांगले नफे मिळवितात. बिर्ला गटांतील कंपन्यांचें भांडवल–गुंतवणुकीचे व्यवहार नफ्यावर दृष्टि न ठेवतां केवळ त्या गटाचें वजन वाढविण्यासाठीच केले जातात असाच कांहीं अर्थ करतां येण्यासारखा नाहीं. पण निरनिराळ्या कंपन्यांना होणाऱ्या नफ्याच्या प्रमाणांत बरीच तफावत दिसून येते, एवढें मात्र खरें. भांडवलाची गुंतवणूक गटाच्या दृष्टीनें करण्यांत येत असली तरी अशी तफावत कां पडते हें सांगतां येत नाहीं. शिवाय कांहीं कंपन्यांच्या भागीदारांना ह्यांत अन्यायहि होतो. बिर्ला गटाच्या कंपन्यांतून गुंतवणुकीची जी पसरण करण्यांत येते तीविषयीं कांहीं तार्किक संगति लावतां येणें कठीण आहे.

भांडवलाच्या धंदेवार गुंतवणुकीसंबंधीं एकूण ८६७·३० लाख रुपयांच्या गुंतवणुकीसंबंधीं माहिती मिळते. ह्या रकमेपैकी २८·८

टक्के रक्कम रेयॉन व लोकरीच्या कापडाच्या धंद्यांत आणि २८·३ टक्के रक्कम मॅनेजिंग एजन्सी कंपन्यांत व पैसे गुंतविणाऱ्याचा धंदा करणाऱ्या कंपन्यांत घातलेले आहेत. त्यानंतर एंजिनिअरिंग कंपन्यांचा व व्यापारी व संकीर्ण कंपन्यांचा अनुक्रम लागतो. त्यांत अनुक्रमें ९·७ टक्के व ७·६ टक्के रक्कम गुंतवलेली आहे. सुती कापडाच्या धंद्यांत ५ टक्के व पोलादाच्या धंद्यांत ३·९ टक्के अशी गुंतवणूक आहे. सिमेंट, रसायनें व बोटवाहतूक ह्या उद्योगधंद्यांत मात्र कांहींच भांडवल गुंतविलेले दिसत नाहीं. पैसे गुंतविण्याचाच धंदा करणाऱ्या कंपन्यांनीं ४५८·०२ लाख रुपये गुंतविलेले दिसतात. पण, १०२ लाखांच्या गुंतवणुकीचीच तपशीलवार माहिती उपलब्ध आहे. ह्या रकमेपैकी ४५·१२ लाख रक्कम एंजिनिअरिंगच्या धंद्यांत, १४·९४ लाख संकीर्ण व व्यापारी कंपन्यांत आणि १३·३९ लाख सुती कापडाच्या धंद्यांत गुंतविलेले आहेत. पैसे गुंतविण्याचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांपेक्षाहि कापडाच्या गिरण्यांनीं बराच पैसा गुंतविलेला आहे. रेयॉन व लोकरीच्या गिरण्यांत त्यांचा पैसा मुबलक प्रमाणांत गुंतविला गेलेला आहे. ५५७·५९ लाखाच्या एकूण गुंतवणुकीपैकी रेयॉनच्या धंद्यांत २४५ लाख व लोकरीच्या गिरण्यांत २२२ लाख रुपये गुंतविलेले आहेत. तागाच्या गिरण्यांनीं गटांतर्गत कंपन्यांत ८३·५३ लाख रुपये गुंतविलेले आहेत. त्यांपैकी २६·५६ लाख गुंतवणूक ताग व लिनोलिअमच्या धंद्यांत, १८·२५ लाख कापडाच्या गिरण्यांत, व १३·१० लाख पोलादाच्या धंद्यांत झालेली आहे. त्यानंतर एंजिनिअरिंगमध्यें ५·०१ लाख व चहाच्या मळ्यांत ४·२९ लाख रुपये गुंतविलेले आहेत. साखरेच्या कारखान्यांनीं ४७·०६ लाख रुपये गुंतविलेले आहेत. त्यांपैकी बहुतेक रक्कम एंजिनिअरिंगच्या धंद्यांत व पुन्हां साखरेच्याच धंद्यांत गुंतविण्यांत आलेली आहे. दोन्हीं प्रकारच्या कंपन्यांत मिळून २९ लाख रुपये गुंतविलेले आहेत. एंजिनिअरिंगच्या कंपन्या नव्या असल्या तरी त्यांनीं १९ लाख रुपये गुंतविण्याइतपत भांडवलाची सांठवण केलेली दिसते. चहाचे मळे व कोळशाच्या खाणी ह्यांनीं केलेली भांडवलाची गुंतवणूक फारशी लक्षांत घेण्यासारखी नाहीं व त्यापासून मिळणारा नफाहि बेतासबात आहे.

ह्या माहितीवरून कांहीं निष्कर्ष काढतां येण्यासारखें आहेत किंवा नाहींत? बिर्ला गटांतील कंपन्यांचा व्याप आणि धंदेवाईक चोखपणा ह्यांचा विचार करतां एकंदरीनें त्यांना फारसें यश आलेलें नाहीं असें दिसतें. पैसे गुंतविण्याची दिशा अगर गुंतवणुकीपासून मिळणारें उत्पन्न ह्या दोन्ही दृष्टींनीं पहातां वरील निष्कर्ष काढावा लागतो. सध्यां आर्थिक योजनांचे युग आहे. अशा काळांत बिर्ला गटानें केलेली गटांतर्गत कंपन्यांतील भांडवलाची तीनचतुर्थांश गुंतवणूक अशा कामांत झालेली आहे कीं, त्या कामांत अग्रहक्काची संधि सामान्यपणें देण्यांत येत नाहीं. गुंतवणुकीच्या ह्या पद्धतीमुळें जुन्या व फायदेशीर उद्योगधंद्यांतून नव्या अगर सापेक्षतेनें कमी नफा देणाऱ्या उद्योगधंद्यांची उभारणी करण्यास मदत झालेली असणें संभवनीय आहे. तथापि एकंदरीनें पहातां, बिर्ला गटांतील कंपन्यांच्या गटांत व्यापारी कंपन्यांचे व पैशाचे व्यवहार करणाऱ्या कंपन्यांचें वाजवीपेक्षा अधिक प्राधान्य दिसून येतें असें म्हणतां येईल.

## गंगापूर शुगर मिल्सचें उद्घाटन

गंगापूर शुगर मिल्स लि. रघुनाथनगर या साखर कारखान्याचें उद्घाटन मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें दिनांक २६-१२-५८ रोजीं दुपारीं १२॥ वा. झालें. याप्रसंगीं श्री. मुरलीधर शेठ यांनीं त्यांचें हार्दिक स्वागत करून साखर कारखान्याची माहिती दिली. " कंपनी सुरू करण्यासाठी गेल्या तीन वर्षांत शिकस्तीचे प्रयत्न करण्यांत आले. कंपनीस आर्थिक दृष्टीनें पूर्वीचें हैद्राबाद सरकार, मुंबई सरकार व जनता जनार्दनाचा चांगला पाठिंबा मिळाल्यामुळें कंपनीस मूर्त स्वरूप आलें आहे. तसेंच ज्येष्ठ व श्रेष्ठ लोकांच्या सूचना व तज्ज्ञांची मदत यांचाहि फार उपयोग झाला. फॅक्टरी उभी करण्याचे कामीं लहानसहान मजुरापासून तो आपले देशांतील व परदेशांतील तज्ज्ञ इंजिनियर यांनीं जी मेहनत घेतली, त्याबद्दल या प्रसंगीं कृतज्ञता व्यक्त करणें हें माझें कर्तव्य समजतों. '

कंपनीची मशिनरी फ्रान्समधील ' केल ' या कंपनीची असून तिची किंमत रु. ५६॥ लाख इतकी आहे. तसेंच कंपनीचे स्वतःचे कार्यक्षेत्राखालीं ४ हजार एकर जमीन असून आजूबाजूच्या ३ ते ४ हजार एकर जमिनींत उसाचें उत्पादन होईल व यामुळें या भागांतील शेतकऱ्यांचा फायदा होईल. कंपनी रोज १ हजार पोती साखर तयार करील व तिचें वार्षिक उत्पादन १॥ ते २ लाख पोती होईल.

या कंपनीमुळें मराठवाड्यांतील औद्योगीकरणास पुष्कळ मदत होईल या भागांतील पुष्कळ लोकांना कामधंदा मिळूं शकेल. शिवाय कंपनीला ऊंस पुरविणाऱ्या १० मैलांच्या आसमंतांतील शेतकऱ्यांची ३,००० एकर जमीन भिजण्याची व्यवस्था झाली आहे. या शेतकऱ्यांसाठीं रिझर्व्ह फंड सुमारें २५ लाख रुपये राखून ठेवलेला आहे. ते कंपनीचे शेअर होल्डर्स होतील. ही योजना एकूण १ कोटी, ३० लक्ष रुपयांची असून मराठवाड्यांतील पांच जिल्ह्यांत हा मोठा कारखाना आहे.

---

मध्यप्रदेशामधील तांदूळ—मध्यप्रदेश सरकार राज्यांत तांदुळाची खरेदी करूं लागलें आहे. राज्याच्या शिल्लकी तांदूळापैकीं ४ ते ६ लाख टन तांदूळ मुंबई व पश्चिम बंगाल राज्यांना पुरविण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. उकडचा तांदूळ पश्चिम बंगालला व साधा मुंबई राज्याला पुरविण्यांत येईल.

संरक्षण खात्याची नुकसानी—संरक्षण खात्यानें आयात केलेला नाना प्रकारचा माल चालू व पुढील गरजांपेक्षा अधिक असेल तर तो विकून टाकण्यांत येतो. अशा तऱ्हेनें मालाची विल्हेवाट लावण्यांत आल्यामुळें संरक्षण खात्याला गेल्या चार वर्षांत १२·५ कोटी रुपये नुकसान सोसावें लागलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## वृत्तपत्रांच्या खपाचे तौलनिक आंकडे

रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडियाच्या १९५७ च्या अहवालावरून या देशांतील एकूण २८४३ वृत्तपत्रांचा खप ११३ लाख असल्याचें दिसून येतें. यांत ३१·४९ लाख दैनिकें ३१·६२ लाख मासिकें, २०·५२ लाख साप्ताहिकें, १४·४९ लाख पाक्षिकें व ४·४८ लाख इतर नियतकालिकें यांचा समावेश होतो. या ठिकाणा इतर देशांतील वृत्तपत्रांच्या खपाचे तौलनिक आंकडे देणें उद्बोधक होईल. तदनुसार इंग्लंड, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, रशिया, अमेरिका, जपान व भारत या देशांतील पांच प्रमुख दैनिकांचा खप पुढें दिला आहे.

**इंग्लंड**

| | | |
|---|---|---|
| डेलि मिरर | ... | ४६,५८,७९२ |
| डेलि एक्सप्रेस | ... | ४१,२७,०८५ |
| डेलि मेल | ... | २१,३८,५७० |
| डेली हेरल्ड | ... | १६,४०,७०७ |
| न्यूज क्रॉनिकल ॲण्ड डेलि डिस्पॅच | | १३,९४,००७ |

**फ्रान्स**

| | | |
|---|---|---|
| फ्रान्स–सोइर | ... | १३,५०,००० |
| ले पारिसिए–लिबेरे | ... | ९,००,००० |
| उएस्ट–फ्रान्स | ... | ५,७०,००० |
| ले फिगारो | ... | ५,१०,००० |
| ल औरोरे | ... | ४,९०,००० |

**पश्चिम जर्मनी**

| | | |
|---|---|---|
| बिल्ड–झटुंग | ... | ३०,६२,३०० |
| डाय बेल्ट | ... | २०,००,९०० |
| वेस्टडेनटात्शे अल्जेमीन | ... | ३,९१,७०० |
| हॅंबुर्ग अर्बेंडब्लाट | ... | ३,४४,१०० |
| वीझेइ | ... | २,६२,८०० |

**रशिया**

| | | |
|---|---|---|
| प्रावदा | ... | ५५,००,००० |
| सोव्हिटस्काया रशिया | ... | १७,००,००० |
| इझवेस्टिआ | ... | १५,५०,००० |
| कॉमसोमोलस्काया प्रावदा | ... | १५,००,००० |
| ट्रुड | ... | ७,००,००० |

**अमेरिका**

| | | |
|---|---|---|
| न्यूज ( न्यूयॉर्क ) | ... | २०,८३,९७२ |
| ट्रिब्यून ( चिकागो ) | ... | ९,४३,७४१ |
| मिरर ( न्यूयॉर्क ) | ... | ८,७६,९३८ |
| बुलेटिन (फिलाडेल्फिआ ) | ... | ७,१८,००७ |
| जर्नल अमेरिकन ( न्यूयॉर्क ) | | ६,९८,८०१ |

**जपान**

| | | |
|---|---|---|
| अशाइ शिसबुन (टोकिओ) | | २३,००,००० |
| योमिउरी शिमबुन ( टोकिओ ) | | २१,४७,९३० |
| मनेची शिमबुन ( टोकिओ ) | | २०,७६,००० |
| मनेची शियबुन ( ओसाका ) | | १५,०७,००० |
| अशाचि रिमबुन ( ओसाका ) | | १४,००,००० |

**भारत**

| | | |
|---|---|---|
| इंडियन एक्सप्रेस | ... | १,३८,५०७ |
| टाइम्स ऑफ इंडिआ | ... | १,१३,३४७ |
| अमृत बझार पत्रिका | ... | ९२,५५२ |
| स्टेट्समन | ... | ८६,७५३ |
| थान्थी | ... | १,२२,३९४ |

यूनोच्या आर्थिक आणि सामाजिक खात्याच्या अंदाजानुसार वरील देशांत दैनिकांचा अंदाजी खप व दरहजार लोकसंख्येमागें त्याच्या प्रती पुढीलप्रमाणें आहेत.

| | | | खप | |
|---|---|---|---|---|
| देश | वर्ष | दैनिकांची संख्या | एकूण हजार | दर १००० लोकांमागें दैनिकांच्या प्रतींची संख्या |
| इंग्लंड | १९५४ | ११४ | २९,११० | ५७० |
| फ्रान्स | १९५५ | १३७ | १०,६९२ | २४६ |
| पश्चिम जर्मनी | १९५४ | ५९८ | १२,५७५ | २४३ |
| रशिया | १९५५ | ७,२४६ | ४९,००० | २४७ |
| अमेरिका | १९५५ | १,७६५ | ५५,०७२ | ३३९ |
| जपान | १९५५ | २५५ | ३५,२७३ | ३९७ |
| भारत | १९५३ | ३३० | २,५०० | ७ |

## " तुमचें ज्ञान आम्हांस कळवा "

**कुलको इंजिनिअरिंग वर्क्स लि. ची योजना**

आमची एक नवी योजना आहे. आमचा कारखाना चांगला चालावा, आहे त्यापेक्षा त्यांत अधिक सुधारणा व्हावी, ठिक-ठिकाणच्या जाणत्यांच्या अनुभवाचा फायदा मिळवावा, त्या सल्लामसलतीबद्दल त्यांना फूल नाहीं फुलाची पाकळी म्हणून कांहींतरी बक्षिस द्यावें, अशा स्वरूपाची ही योजना आहे. कल्पना, सूचना, व्यवहारी अनुभव, ज्ञान यांच्या शोधांत आम्ही आहों. आपणांजवळ यापैकी कांहीं माहिती देण्यासारखी असेल तर आम्हांस ताबडतोब लिहा. आपला अनुभव अगदीं साधा आहे, असें मुळींच वाटूं देऊं नका. प्रत्येकाची माहिती, सूचना, बारकाईनें तपासून तिजबद्दल बक्षिस मिळेल.

व्यवहारासाठी ह्या योजनेचे खालील विभाग केले असून त्यांतील पोटविभागहि दाखविले आहेत. आणखीहि पोटविभाग आपणांस सुचतील. पत्र लिहितांना आपण कोणत्या विभागाबद्दल, कुठल्या पोटविभागाबद्दल लिहीत आहां, तें पत्रावर प्रमुख ठिकाणीं लिहावें.

**विभाग**

**( १ ) योजना**— आंकडे–शास्त्र, त्याचा उपयोग; देशी–परदेशी योजनासमित्या–त्यांचें कार्य; तंत्र; पद्धत; साधनें; वेळापत्रक; श्रमविभाग यांचे तक्ते; कार्यप्रगतीवर देखरेख; अज्ञ व तज्ज्ञ यांच्या सुप्त–जागृत शक्तींचा विकास–त्यांचें सहकार्य.

**( २ ) काम उरकणें**— सूची; कामांची नोंद; पोटकामें–त्यांची सूत्रबद्ध वाटणी; प्रगतीचा तक्ता; परस्पर सहकार्याची जोपासना; वेळेवर काम पार पाडण्याची आवश्यकता.

**( ३ ) व्यवस्था**—सर्व विभागांचे आपसांतील संबंध; रोजचें टपाल; सरकारी नियमांनुसार कंपनी, कारखाना, यांचे व्यवहार; हिशेब, वार्षिक आढावा, नफातोटा पत्रक; इतर खात्यांवर देखरेख; अंतस्थ तपासणी, कायदेशीर करार; दप्तर, जुने कागदपत्र सांभाळणें.

**( ४ ) उत्पादन**— प्रॉडक्शन कंट्रोल; मूळ-किंमत; प्रत्येक वेळीं नियंत्रण-तपास; नव्या सुधारणा; रेकॉर्ड्स; रसायनशाळा-प्रयोगशाळा; संबंधित सामग्री सांभाळ; कामाची घंटेवार प्रगति; कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्न; घरगुती काम वाटप; यांत्रिक निपज; यंत्रांत सुधारणा, काटकसर; फौंड्री व तिच्यासाठी इतर सार्ती; वेल्डिंग; पॉवर हाऊस; यंत्रांची मांडणी; त्यांची नोंद; टेस्टिंग, कलरिंग-पॅकिंग.

**( ५ ) खरेदी**— सूचि; नमुने-मोजमाप; समानगुणी दुसरे पदार्थ; सरकारी निर्बंध; बाजारभावांत चढउतार; तपासणी; सरप्लस; डिस्पोझल; सेकंडहँड मशिनरी.

**( ६ ) विक्री**— जिल्हानिहाय संघटना; आंकडेवारी; विक्रीची वाढ; ग्राहकांच्या आवडीनिवडी; शोध-तपास; हप्त्यानें विक्री; भाडोत्री विक्री; विक्रेत्यांना शिक्षण; व्यवहारी सूचना.

**( ७ ) भांडवल**— संकल्पित, हातीं आलेलें; तयार मालावर कर्ज; इमारती, यंत्रसामग्री यांवर कर्ज; ठेवी; अगाऊ रकमा; भांडवलांत काटकसर; बँका, इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन, यांचें साहाय्य; शेअरखातें; कंपनी कायदा.

**( ८ ) वाहतूक**— वाहनें, रस्ते, साधनें; वेळ, खर्च, यांचा हिशेब; आगगाडी, आगबोट, विमान, मोटर यांचें वेळापत्रक; दर, भाडें, वेळ वगैरे तुलनात्मक अभ्यास.

**( ९ ) कामगार कार्यकर्ते**—मजूर-कारकून यांतील परस्पर सलोखा; कामाचें मोजमाप; वेतनप्रमाण; कार्यक्षमता वाढविण्याचे मार्ग, कल्याणकारी सोई-सवलती; सरकारी निर्बंध.

**( १० ) शिक्षण**— व्यावसायिक-पुस्तकी शिक्षण; कारागिरी-हुन्नर वाढविण्याचे मार्ग; निरीक्षण, हस्तकौशल्य वाढविण्याचीं साधनें; व्यवहारी माहिती; खातेवार तक्ते भरण्याची माहिती; प्रगतीच्या पायऱ्या; बढतीसाठी प्रयत्न.

**( ११ ) आरोग्य**— शरीरसामर्थ्य वाढविणें; रोगप्रतिकाराची शक्ति; उपलब्ध औषध-पद्धतींचा तौलनिक अभ्यास; उपचारासाठी खर्च; सर्व तक्त्यांवरून संशोधनाला साधनें.

**( १२ ) प्रचार**— प्रसार-प्रचार साधनें-उपयोग; हरप्रकारची साधन-सूचि; व्यक्तिसूचि.

**( १३ ) समाज-सरकार-संपर्क**— सरकारचीं नियंत्रणें, त्यांचे परिणाम; समाजसेवेचे मार्ग; माहितीखातें; यांत्रिक-तांत्रिक मदत देण्याची रीत.

**( १४ ) संशोधन-विकास**— वरील सर्व विभागांतील अडचणींचा विचार; कार्यक्षमता वाढविण्याचे, खर्च कमी करण्याचे मार्ग; सल्लागारांची निवड-त्यांच्याशीं पत्रव्यवहार; कार्यपद्धतीचे तक्ते.

ही नुसती जंत्री आहे. या विभागांत आणखीहि पुष्कळ पोटविभाग करतां येतील. यांपैकी कोणत्या कामाची माहिती, अनुभव आपणांस आहे, तें कळवावें. प्रत्येकाच्या सल्ला-मसलतीचा विचार करूं आणि बक्षिस देऊं. "एकमेकां साह्य करूं, अवघे धरूं सुपंथ".

पत्रव्यवहाराचा पत्ता :—"कुल्को" इंजिनिअरिंग वर्क्स लि. शेंबेकर बंगला, गणेशवाडी पुणें ४.

---

### लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या कामांत घट ?

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें १९५७ सालीं नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्याचे अखेरीस २८१ कोटी रुपयांचें काम पुरें केलें होतें. १९५८ सालीं त्याच मुदतींत १८० कोटी रुपयांचें काम पुरें झालें आहे. म्हणजे कामांत सुमारें १०० कोटी रुपयांची घट आहे. वर्षअखेरीच्या कांहीं आठवड्यांत काम ज्यास्त मिळतें, हें लक्षांत घेऊनहि, १९५८ मध्यें एकूण काम कमीच होणार, असा रंग दिसतो. विम्याच्या व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर विमेदार, विमे व विम्यांची रक्कम ह्या सर्वच बाबतींत अधिक प्रगति झाली पाहिजे, अशी साहजिकच अपेक्षा आहे. ह्याच्या उलटहि बातमी प्रसिद्ध झाली आहे. तिच्याप्रमाणें, १९५८ सालीं आयुर्विमा कॉर्पोरेशननें ३०० कोटी रुपये किंमतीचीं नवीं विमापत्रकें दिलीं असावीं असा अंदाज करण्यांत आला आहे. १९५७ सालीं कॉर्पोरेशननें २७६ कोटींचें नवें काम मिळविलें होतें. कॉर्पोरेशन स्थापन झाल्यापासून नव्या कामाबाबत हा उच्चांकच होईल.

---

### बँकांचीं अन्नधान्याच्या तारणावरील कर्जें

तांदूळ, गहूं व इतर अन्नधान्यें ह्यांचे तारणावरील बँक कर्जांचीं नियंत्रणें रिझर्व्ह बँकेनें १९५९ मध्येंहि चालू ठेवलीं आहेत. किमान ४०% मार्जिन आणि वैयक्तिक कर्जाची कमाल रक्कम ५०,००० रु. पेक्षा ज्यास्त न करणें, हीं त्यांतलीं मुख्य नियंत्रणें आहेत.

---

### पाकिस्तानांतील सार्वजनिक सुट्ट्या

पाकिस्तान सरकारनें १९५९ मधील सुट्टीचे दिवस जाहीर केले आहेत, त्यांत अल्पसंख्याकांच्या उत्सवांस व धार्मिक प्रसंगांना स्थान दिलेलें नाहीं. हिंदूंच्या, ख्रिस्त्यांच्या किंवा पार्शांच्या अशा उत्सवांचा उल्लेख नाहीं. त्यांनाच फक्त त्यापुरत्या सुट्ट्या मिळतील.

---

**दिल्लीमधील माकडांचा उपद्रव**—दिल्लीमधील माकडांचा उपद्रव नाहींसा करण्याची तयारी एका कंपनीनें दाखविली असून आपली योजना म्युनिसिपालिटीला सादर केली आहे. माकडें पकडणाऱ्या एका तज्ज्ञाला जरूर ते सापळे पुरवून हें काम करण्यांत येणार आहे. प्रत्येक पकडलेल्या माकडामागें म्युनिसिपालिटीनें १० रुपये द्यावयाचे आहेत.

**बद्रीनाथाला झालेली मिळकत**— गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत बद्रीनाथाला आलेल्या यात्रेकरूंकडून देवस्थानाला २॥ लाखांवर रुपयांची प्राप्ति झाली. बद्रीनाथ व केदारनाथ देवस्थान कमिटीनें १९५९-६० सालचें अंदाजपत्रक मंजूर केलें आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठी वाटेवर ठिकठिकाणीं धर्मशाळा बांधण्याचें कमिटीनें ठरविलें आहे.

**डॉलरच्या भूमीची मोहिनी**—नवीन वर्षाच्या प्रारंभानिमित्त मॉस्को येथें परदेशीय प्रतिनिधींना रशियन सरकारनें खाना दिला. त्याप्रसंगीं बोलतांना प्रधानमंत्री मि. क्रुश्चॉव्ह म्हणाले कीं सरकारचे प्रतिनिधि मि. मिकोयान अमेरिकेला जाती आहेत. अमेरिकन डॉलरची त्यांच्यावर मोहिनी पडली तर ते एखादे वेळेस परतहि येणार नाहींत. मि. मिकोयान ह्यावर खदखदून हसले.

# भांडवल नाहीं पण योजनाचातुर्य तर आहे !

## दयाळू बापांची व्याख्या : मराठ्यांच्या परीक्षेची वेळ

( लेखक :—उद्योगरत्न वि. रा. वेलणकर )

ही महाराष्ट्रभूमि धान्याच्या राशी देणारी नसली तरी भारताला पराक्रमी लोक पुरविणारी आहे. या मायदेशाबद्दल आपणांस अभिमान वाटून एकामेकांत बंधुभाव निर्माण झाला पाहिजे.

बंधुभाव निर्माण करणें व कलहाचा नायनाट करणें यासाठी प. पू. विनोबाजी भावे यांनीं रामबाण मात्रा शोधून काढली आहे. श्री. विनोबाजी म्हणतात "तुमच्यांत दुमत असूं दे, तुम्ही खूप चर्चा करा, वेळप्रसंगीं भांडा देखील, पण नंतर बंधुभावानें एकमेकांना मिठ्या मारा व आपापल्या घरीं जा." प्रिय विनोबांची ही मात्रा नक्की बंधुभाव निर्माण करील. कलहाची हाकालपट्टी ही पहिली गोष्ट झाली, तर बारा आणे कार्य होऊन गेलें असें म्हणावें लागेल. आतां दुसरी गोष्ट म्हणजे—

### आर्थिक स्वातंत्र्याबद्दल

इंग्रजी राज्याचे गेल्या १५० वर्षांत मराठ्यांनीं ( १ ) मॅट्रिक ( २ ) कॉलेज ( ३ ) नोकरी व ( ४ ) पेन्शन हा जिना पसंत केला. पण युग बदलल्यामुळें तो जिना आज पूर्ण निरुपयोगी आहे. जे पहिल्या वर्गात उत्तीर्ण होतात त्यांनीं सरकारी नोकऱ्या धराव्यात. पण दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाच्या लोकांनीं व्यापारांत, कारखानदारींत शिरावें. व्यापार व कारखानदारी या कांहीं अवघड बाबी नाहींत, कीं आपण त्याला भ्यावें. ( १ ) आधीं मनानें नक्की ठरवावें कीं माझें जीवन व्यापारांत अगर कारखान्यांतच व्यतीत करीन. नंतर ( २ ) उमेदवारीसाठी कमींत कमी ४ वर्षें, मॅट्रिकनंतर कॉलेजांत खर्च करतात तशीं, खर्च करावीं. या ४ वर्षांत डोक्यावर बोजा घेणें, घरोघरीं हिंडून माल विकणें, हिशेब ठेवणें, पत्रव्यवहार करणें, ग्राहक पटविणें, वगैरे गोष्टी शिकाव्यात.

इंग्रजी राज्यांतील नोकरीपेशामुळें घात झाला तो असा—( १ ) घड्याळाकडे पाहून साडेपांच वाजले कीं सुटका झाली, असें मानणारा तो म्हणजे कामांत चुकार बनला. ( २ ) कचेरींतून सुटल्यावर दुसरे दिवसापर्यंत कामाचा विचार नको असें झाल्यामुळें, कार्याची जबाबदारी घेण्यास तो नालायक बनला. ( ३ ) लोकांच्या सरबराईमुळें आनंदित होणारा, असा तो सरबराई पुष्ट व समाजापासून तुटक असा बनला. अशा लोकांच्या हातून पराक्रम काय होणार व हे हमरस्त्यावर इमारत कशी बांधणार ?

आजवर महाराष्ट्रियांनीं म्हणजेच मराठ्यांनीं राजकीय स्वातंत्र्यासाठी लढत केली तशी लढत आर्थिक स्वातंत्र्यासाठी कां न करावी ? महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्याचे नगरांत हमरस्त्यावर उंच इमारती मराठ्यांच्या का नसाव्या ? हें महदाश्चर्य आहे. स्वतःच्या देशांत ज्यांना मान नाहीं त्यांना परदेशांत कोण विचारतो ? तेव्हां आपण सुधारणा केली पाहिजे. समाजांतील वेचक लोक म्हणजे महाविद्यालयांतील विद्यार्थी; पण त्यांनीं आपले नजरेपुढें जर मॅट्रिक; कॉलेज, नोकरी व पेन्शन ( निवृत्तिवेतन ) हाच मार्ग ठेवला तर देशावर मोठी आपत्तीच ओढवेल व पुढच्या ५० वर्षांपर्यंत देश पुढें जात नाहीं, असें ठरेल.

### खरा दयाळू बाप कोणता ?

दुकानदारी ही नोकरीसारखी व्यक्तिगत नसून वंशपरंपरेनें चालणारें तें एक व्यापारी सिंहासन आहे. असले व्यापारी सिंहासन जो तयार करतो तोच खरा दयाळू बाप ! कीं, ज्यामुळें वंशांतील लोकांना नोकरीसाठी अर्ज घेऊन दारोदारीं हिंडण्याचें कारण पडत नाहीं. महाराष्ट्रांत असले दयाळू बाप तयार झाले पाहिजेत. या सर्व सुखद गोष्टी होण्यासाठी व्यापाराला आड येणारा आंगचुकारपणा व जबाबदारी अंगावर घेण्याची भीति ज्या नोकरीमुळें निर्माण होते त्या वृत्तीचें कंबरडें प्रथम मोडलें पाहिजे.

दोन पैसे कमी मिळाले तरी चालतील पण डोक्याला त्रास नको ही महाराष्ट्राला कमीपणा आणणारी भ्याडवृत्ति होय !

वाटेल तेवढे कष्ट करायला व जबाबदारी घ्यायला तयारी आहे, पण माझी हमरस्त्यावर उंच इमारत झाली पाहिजे, ही महाराष्ट्राची इभ्रत वाढविणारी वीरवृत्ति होय !

पूर्वी काळीं रणजितसिंग व समशेरबहाद्दर या पदव्या मानाच्या होत्या; पण आजच्या युगांत व्यापारजितसिंग व उंच इमारत बहाद्दरच लोक आपणांस हवेत. तसेंच तरुणांशीं बोलतांना "तूं नोकरीला लागशील तो माझा सुदिन" असें न म्हणतां "तूं ज्या दिवशीं उंच इमारत बांधशील व ती मी पाहीन तो माझा सुदीन" असे शब्दप्रयोग योजून मराठी तरुणांची महत्त्वाकांक्षा वाढविली पाहिजे.

### कोण श्रेष्ठ ? भांडवल, मजूर कीं चालक ?

स्वराज्यप्राप्तीनंतर गेल्या १० वर्षांत अनेक भ्रम नाहींसे झाले आहेत. त्यांपैकीच कारखानदारीबद्दलचे कांहीं भ्रम साफ झाले आहेत. कारखानदारीचे भाग आम्हीं तीन करतों. पहिला भाग भांडवलाचा, दुसरा भाग मजुरांचा व तिसरा भाग चालकांचा. असे तीन भाग जरी मान्य झाले तरी यांत श्रेष्ठ–कनिष्ठ कोणाला मानावें ? हाच मोठा थोरला वाद आहे.

भांडवलवाले म्हणतात : भांडवलच नसलें म्हणजे गिरणीच उभी नसेल तर मजूर कसले काम करणार ? व चालक तरी कशाचें चालकत्व करणार ? त्यांचे याहि बोलण्याचा विचार केला पाहिजे. बरे मजूर नसले तर कारखानारूपी भांडवल स्वस्थच बसेल. सोलापूरची जुनी गिरणी बंद पडली. सरकारला वाटलें आपण ती चालवूं. सरकारनें १९५७-५८ सालीं चालवून पाहिली, पण खूप मोठी नुकसानीच आली. त्या कामीं सरकारी चालकत्वाचा भ्रम नाहींसा झाला. नंतर ती गिरणी पुन्हां बंद पडली. त्यामुळें मजूर बेकार झाले. सरकार भांडवल देण्यास तयार होते, पण मजुरांचे पुढारी गिरणी चालवूं शकले नाहींत. कारण मजुरांच्या पुढाऱ्यांना चालकत्व करून भांडवल यशस्वीपणानें हाताळावें कसें ? याचें ज्ञान नसल्यानें गिरणी, भांडवल व मजूर इतकी समृद्धि असूनहि चालकत्वाची शक्ति अंगीं नसल्यानें गरीब बिचारे मजूर बेकारीच्या खाईत लोटले गेलेच. "योजकस्तत्र दुर्लभः" हेंच अखेर खरें ठरलें. महाराष्ट्रापाशीं भांडवल नसलें तरी कांहीं अडत नाहीं. योजना करून, हिकमत लढवून करामत चालविणाराच श्रेष्ठ असल्यानें मराठा तरुणांनीं योजकच व्हावे व भांडवलाची सवाई कशी होईल ही कला अंगीं आणावी.

### घरीं कामधेनु, पुढें भीक मागें

मराठ्यांनीं अट्टाहास करून मिळविलेली कोयनेची वीज महाराष्ट्रांत संचार करणार ! अशा समयीं विजेचा उपयोग किती महाराष्ट्रीय करून घेतात ही परीक्षाच आहे. मराठे तरुणांचे पुढें जर हायस्कूल, कॉलेज, नोकरी व पेन्शन हेंच ध्येय असेल तर त्याचा फायदा मराठ्यांना मिळणार नाहीं. आज मुंबईत पाहिलें

तर महाराष्ट्रांतील लोक एक तात्या, दुसरा घाटी व तिसरा बालू! यांतील तात्या लिहीत बसलाय, घाटी बोजे उचलतो व बालू भांडीं घासतो. मुंबईच्या अनेक इमारतींपैकीं तात्यांच्या किती? आणि घाटी व बालूंच्या किती? याचा विचार केला तर लज्जेनें मान खाली घालावी लागते. सध्याचें युग ओळखून पारशी लोकांनीं आर्थिक समरांगणावर कसा पराक्रम करून दाखविला आहे, तें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून आपण तसें वागलें पाहिजे. कोयनेची वीज मिळतांच छोटे छोटे शंभर कारखाने मराठ्यांचे पहिल्या वर्षींच निघाले पाहिजेत. तसें न होईल तर "घरीं कामधेनु पुढें भीक मागें" या वचनासारखी दशा होईल. आतांपासूनच तरुणांनीं कंबर बांधावी! कारण ही परीक्षेची वेळ आहे!!!

(पुरुषार्थाच्या श्रीगजानन मिल सुवर्णमहोत्सव अंकाच्या लेखांतील उतारे).

---

### व्यापारी पत्रव्यवहारांतील कांहीं व्याख्या

"विचार चालू आहे": फाइल हरवली आहे.

"लक्ष पुरवीत आहों": फाइल शोधण्याचा प्रयत्न चालू आहे.

"आपल्या निदर्शनास आणीत आहों; योग्य तें करावें": तुम्हीं वाटेल तें करून कुणाकडेतरी हें प्रकरण लोटून टाका.

"आपण मिळून विचार करूंया": मला मार्ग दिसत नाहीं; तुम्हींच बघा सापडतो का.

"कार्यक्रम पार पाडा": अधिक नोकर नेमा आणि काम वाढवून दाखवा.

"आम्हीं तपशीलवार चौकशी करीत आहों": उत्तरासाठी तुम्हांला खूप दिवस वाट पहावी लागेल.

"आपल्या अधिक चौकशीबद्दल आभार": तुमच्या फाजील चौकशांनीं आम्हांला वीट आला आहे.

---

### हिंदी रेझर ब्लेड्सची निर्गत

भारतांत तयार होणाऱ्या वस्तऱ्यांच्या पात्यांपैकी २५% पातीं आतां निर्गत होऊं लागलीं आहेत. पाकिस्तान, सिंगापूर, मलाया, अफगाणिस्तान, नेपाळ, केनिया, इत्यादि ठिकाणीं त्यांची निर्गत होते.

---

**नैनिताल येथें दोरांचा अधांतरी रस्ता**—नैनिताल ह्या निसर्गरम्य ठिकाणचीं तीन सौंदर्यस्थळें पहातां येण्यासाठी उत्तरप्रदेश सरकारनें दोरांच्या साह्यानें अधांतरी पाळणे नेण्याची व्यवस्था करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी नेमण्यांत आलेल्या कमिटीचा अहवाल मंजूर झाला आहे. कामासाठी ६५ लाख रुपये खर्च येईल.

**भोपाळ येथें नवा ध्वनिक्षेपक**—भोपाळ नभोवाणी केंद्रावर १० किलोवॅट शक्तीचा नवा ध्वनिक्षेपक चालू करण्यांत आला आहे. त्यामुळें भोपाळच्या आसपासच्या ५०० मैलांच्या परिसरांत कार्यक्रम अधिक चांगल्या रीतीनें ऐकूं येतील. नव्या ध्वनिक्षेपकाची यंत्रसामुग्री कोलंबो योजनेप्रमाणें ऑस्ट्रेलियानें पुरविली आहे.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७०,००,०००चे वर |

बँकेचे इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.